# आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वये निवेदन

आरोपीचे नांव – दिनेश डी. श्रीगिरीवार,

वय वर्षे – ४३

धंदा – व्यापार

राहणार – खिल्लावार्ड, ता.भद्रावती, चंद्रपुर

| | |
|---|---|
| प्रश्न १ | आता तुम्हाला काही प्रश्न विचारले जातील. त्या प्रश्नांची उत्तरे देणे तुमचेवर बंधनकारक नाहीत. तुम्ही त्या प्रश्नांना उत्तरे देणेस नकार देऊ शकता. तुम्ही प्रश्नांची उत्तरे दिली नाहीत अथवा खोटी उत्तरे दिली तर शिक्षेस पात्र होणार नाही. परंतु तुम्ही उत्तरे दिली तर ती उत्तरे तुमचे विरुध्द या केसमध्ये पुरावा म्हणून वापरण्यात येऊ शकतात. हे तुम्हाला कळाले का ? |
| उत्तर | होय |
| प्रश्न २ | फिर्यादी तर्फे फिर्यादी साक्षीदार क्रमांक **०१ संजय भास्कर रनदिवे** यांच्या पुराव्यात असे आले आहे की, ते वे.को.ली येथे कर्मचारी आहेत. ते तुम्ही आरोपी यांना ३ ते ४ वर्षापासुन ओळखत असुन त्यांची व तुमचे संबंध मैत्रीचे आहेत. याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ? |
| उत्तर | मी त्यांना ओळखत नाही. |
| प्रश्न ३ | त्यांच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, त्यांचे व तुम्हचे मैत्रीचे संबंध असल्यामुळे त्यांनी तुम्हाला बऱ्याच वेळा १५ ते २० हजार उसने म्हणुन द्यायचे व ते तुम्ही त्यांना परत सुद्धा करायचे. याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ? |
| उत्तर | माझी त्यांच्या बरोबर ओळख नसल्यामुळे मी त्यांच्या कडुन उसने |

| | |
|---|---|
| | घ्यायचा प्रश्न येत नाही. |
| प्रश्न ४ | त्यांच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, त्यानंतर जुलै २०२३ मध्ये तुम्हाला महत्वाचे काम आहे असे सांगुन तुम्ही फिर्यादीकडुन **४,००,०००/–** रुपयाची मागणी केली व ते १५ ते २० दिवसात परत करतो असे त्यांना सांगितले. त्यामुळे त्यांनी तुमचे मैत्रीपुर्ण संबंध व तुम्ही हात उसणी घेतलेली रक्कम वेळोवेळी परत केल्यामुळे त्यांनी तुम्हाला **३,५०,०००/–** नगदी वणी येथील त्यांच्या घरी दिले. याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ? |
| उत्तर | खोटे आहे. |
| प्रश्न ५ | त्यांच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, सदरची घेतलेली हात उसनी रक्कम बँकेमार्फत परतफेडी करण्याकरीता तुम्ही दिनांक २५/०७/२०२३ रोजी तुमच्या खाते असलेल्या बँक म्हणजेच **एच डी एफ सी बँक शाखा चंद्रपुर** या खात्याचा **धनादेश क्र.०००११५** रक्कम रुपये **३,५०,०००/–** फिर्यादीसमोर सही करुन फिर्यादीच्या नावाने दिला. सदरचा चेक **नि.क्र.५०** वर दाखल आहे. याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ? |
| उत्तर | खोटे आहे. |
| प्रश्न ६ | त्यांच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, सदरचा धनादेश फिर्यादीने वटण्याकरीता त्यांच्या भारतीय स्टेट बँक शाखा वणी खाते क्र.११२३२१७१७९२ या बँकेमध्ये भरला असता तो धनादेश दिनांक **२७/०७/२०२३** रोजी न वटता अपुरा निधी या शे–याने परत आला. चेक डिपॉझीट केल्याची पावत्या **नि.क्र.५१** व **५२** व तो मेमो या कामी **नि.क्र.५३** वर दाखल आहे. याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ? |
| उत्तर | मी चेक दिलाच नाही त्यामुळे मला त्याच्या बद्दल काही बोलायचे |

| | |
|---|---|
| | नाही. |
| प्रश्न ७ | त्यांच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, फिर्यादीने त्यांच्या वकिलामार्फत दिनांक **०५/०८/२०२३** रोजी तुम्हाला नोटीस पाठवुन सदरच्या रक्कमेची नोटीस मिळाल्यापासुन १५ दिवसात मागणी केली. याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे ? |
| उत्तर | मला नोटीस मिळाली नाही. |
| प्रश्न ८ | त्यांच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, सदरची नोटीस तुम्हाला दिनांक **०९/०८/२०२३** रोजी मिळाली परंतु तुम्ही फिर्यादीला पैसे अदा केले नाही. या कामी **नि.क्र.५४** वर नोटीस दाखल आहे. **नि.क्र.५५** व **नि.क्र.५६** वर पोष्टल पावती व पोच पावती दाखल केलेले आहे तसेच पोस्टल ट्रॅकींग डिटेल्स या **नि.क्र.५७** व **नि.क्र.५८** दाखल केलेले आहेत. |
| उत्तर | मला नोटीस मिळालीच नाही. |
| प्रश्न ९ | त्यांच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, फिर्यादीने त्याची सॅलेरी स्लीप दाखल केलेली आहे. ती याकामी **नि.क्र.५९** वर दाखल केलेली असुन **नि.क्र.६०** वरती **७/१२ उतारा** दाखल केलेला आहे. या बाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे. |
| उत्तर | त्या बद्दल मला माहिती नाही. |
| प्रश्न १० | वरील साक्षीदार तुमच्याविरुध्द का साक्ष दिली ? |
| उत्तर | माहिती नाही. |
| प्रश्न ११ | तुम्हाला शपथेवर तुम्हाला स्वतः तपासायचे आहे का ? |
| उत्तर | होय. |
| प्रश्न १२ | तुम्हाला बचावाचा पुरावा द्यावयाचा आहे का ? |

| | |
|---|---|
| उत्तर | होय. |
| प्रश्न १३ | तुम्हाला या केसबद्दल आणखी काही सांगावयाचे आहे का ? |
| उत्तर | मला रामनगर पोलीस स्टेशन फोन आल्यानंतर मी या ठिकाणी हजर झालो आहे मी सदरचा चेक हा माझे मित्र विजय पत्तेवार यांच्याकडे सेक्युरिटी म्हणुन दिलेला होता. माझा बिजनेस हा कॅटरिंगचा आहे. साक्षीदार अभिलेखावर दाखल केलेला चेक पाहुन सांगतो की, सदरचा चेक वरील चेक व स्वाक्षरी माझी असुन त्यावरील मजकुर माझा नाही. |

आरोपीची सही समोर,

BIRADAR AMOL BALAJI
Digitally signed by BIRADAR AMOL BALAJI
Date: 2025.11.07 11:16:17 +0530

दिनांक ०६/११/२०२५ **(ए.बी.बिरादार)**

वणी. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, वणी

**प्रमाणपत्र**

असे प्रमाणित करण्यात येते की, वरील निवेदन माझ्या समक्ष ऐकण्यात व घेण्यात आले असून आरोपीने दिलेला जबाब पुर्णपणे सत्यतेने नोंदविण्यात आला आहे.

BIRADAR AMOL BALAJI
Digitally signed by BIRADAR AMOL BALAJI
Date: 2025.11.07 11:16:21 +0530

दिनांक ०६/११/२०२५ **(ए.बी.बिरादार)**

वणी. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, वणी